# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२४-२५/१७१

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील दिनांक ५ ऑक्टोबर, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील अकरावी सभा शनिवार दिनांक ५ ऑक्टोबर, २०२४ तसेच सौर दिनदर्शिकेनुसार ३ आश्विन, शके १९४६ रोजी सायंकाळी ४:०० वाजता फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२ येथे हायब्रीड आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | डॉ. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | अनुपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | डॉ. प्रसाद कारंडे (कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | (सी.ए.) हर्षल वाघ (वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

श्रद्धांजली :

### अविनाश पंडित

जेष्ठ अनुवादक (मुंबई विद्यापीठातील भूगोल विभाग), संशोधक , भाषातज्ज्ञ अविनाश पंडित यांचे दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजी आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ७३ वर्षाचे होते.

### मधुरा जसराज

प्रसिध्द लेखिका, दिग्दर्शिका आणि दिवंगत शास्त्रीय गायक पंडित जसराज यांच्या पत्नी मधुरा जसराज यांचे दिनांक २५ सप्टेंबर, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षाच्या होत्या.

### डॉ. सुभाष चौधरी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे दिनांक २६ सप्टेंबर,२०२४ रोजी उपचारादरम्यान आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५९ वर्षांचे होते.

### रोहिदास पाटील

खान्देशचे नेते व माजी मंत्री रोहिदास (दाजीसाहेब) चुडामण पाटील यांचे दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन

झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

### केकी दारुवाला

प्रसिध्द कवी, लेखक आणि माजी आयपीएस अधिकारी केकी एन.दारुवाला यांचे दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षाचे होते.

### श्रीकांत भट

जेष्ठ विधिज्ञ श्रीकांत भट यांचे दिनांक ३० सप्टेंबर,२०२४ रोजी वृध्दापकाळाने आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

### नितीन चव्हाण

महाराष्ट्र टाईम्सचे जेष्ठ पत्रकार श्री. नितीन चव्हाण यांचे दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ रोजी आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५३ वर्षांचे होते.

### विमला पाटील

भारताच्या पहिल्या महिला संपादिका म्हणून ख्याती मिळविलेल्या लेखिका, पत्रकार विमला पाटील यांचे दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९१ वर्षाच्या होत्या.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक २० सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक २० सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | दिनांक २५ मार्च २०२४ आणि २७ एप्रिल २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक २५ मार्च २०२४ आणि २७ एप्रिल २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेत मान्य करण्यात आला. | |
| ३ | डॉ. अनिल कुमार सिंग यांच्या अध्येक्षतेखाली तयार केलेला सविस्तर अहवाल मान्यतेस्तव सादर. | कुलसचिवांचे कार्यालय / दक्षता व आपत्ती व्यवस्थापन विभाग |
| ठराव | डॉ. अनिल कुमार सिंग यांच्या अध्येक्षतेखाली तयार केलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. कुलगुरू व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी काही सूचना मांडल्या. सदर सूचनांचा समावेश करून अहवाल स्वीकारण्यात आला. | |
| ४ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधकामासाठी Tribal Development Department व Social Justice Department यांच्याकडून वसतिगृह बांधण्याच्या परवानगीबाबत मा. प्र-कुलगुरूंचा अहवाल मान्यतेस्तव सादर. | कुलसचिवांचे कार्यालय / पायाभूत सुविधा, नियोजन व अंमलबजावणी विभाग |
| ठराव | मा. प्रकुलगुरुंचा अहवाल मान्य करण्यात आला. सदर अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती खालील मुद्द्ये अहवालात समाविष्ट करण्यात यावे असे ठरले.<br>१) या वसतिगृहात मुंबई विद्यापीठाच्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थांना प्रामुख्याने पहिले प्राध्यान देण्यात यावे.<br>२) मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी प्रवेश पूर्ण झाल्यावर मुंबई विद्यापीठाचे मान्यता प्राप्त महाविद्यालयांच्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थांना प्राध्यान देण्यात यावे.<br>३) महाविद्यालयांच्या विद्यार्थांना प्रवेश पूर्ण झाल्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या जनरल विद्यार्थांना प्रवेश देण्यात यावे.<br>४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वसतिगृहाचे व्यवस्थापन व सुरक्षेची जबाबदारी त्यांची असेल.<br>५) आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहाचे व्यवस्थापन व सुरक्षेची जबाबदारी | |

| | | |
|---|---|---|
| | त्यांची असेल.<br>६) वसतिगृहात प्रवेश करताना मल्टिपल गेट असावे, तसेच यासाठी संमिश्र व्यवस्था कशी करता येईल याचा विचार करावा.<br>कलिना येथील वसतिगृहाची क्षमता पूर्ण झाल्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या ठाणे, रत्नागिरी व कल्याण येथील वसतिगृहांची क्षमता वाढविण्या बाबत Tribal Development Department व Social Justice Department यांना कळविण्यात यावे असे ठरले. | |
| ५ | विभागीय चौकशी बाबत. | |
| ठराव | सदर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्यात यावे असे ठरले. | |
| ६ | शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने शासनस्तरावर विद्यापीठ प्रशासनाच्या अथक प्रयत्नामुळे निर्गमित झालेल्या ०२ शासन निर्णयाबद्दल तसेच शासनमान्य पदावरीत अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्यांबाबत मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघाने त्यांच्या दिनांक २४/०८/२०२४ च्या पत्रान्वये विद्यापीठ प्रशासनाचे आभार मानले आहेत. कृपया माहितीस्तव सादर. | मानव संसाधन कक्ष |
| ठराव | सदर पत्राची नोंद घेण्यात आली व मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघाला आभार पत्राची नोंद घेण्यात आली असे कळविण्यात यावे, असे ठरले. | |
| ७ | ज्ञानोदय महाविद्यालयाच्या चुका ह्या गंभीर स्वरूपाच्या असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी, सदर बाब योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर. | परीक्षा विभाग. |
| ठराव | ज्ञानोदय महाविद्यालयाच्या चुकाबाबत सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, महाविद्यालयाने विहित मुदतीत दंड भरलेला नाही. त्यामुळे सदर महाविद्यालयांस दंड व दंडावरील व्याज कळविण्यात यावे. सदर महाविद्यालयांस दंड भरण्याबाबत तात्काळ पत्र देण्यात यावे. महाविद्यालयास दंड जमा करण्यास प्रथम १५ दिवसाची मुदत देण्यात यावी. महाविद्यालयाने दंड जमा करण्यास मुदत मागितल्यास पुढील १५ दिवस देण्यात यावे. आणि जर महाविद्यालयाने त्याही मुदतीत दंड भरला नाहीतर सदर महाविद्यालयाची मान्यता काढून घेण्याची प्रक्रिया सुरु करावी. | |
| ८ | ठाणे महानगर पालिकेस हायमास्ट पोल उभारणीसाठी परवानगी देणेबाबत बाब विचारार्थ सादर. | ठाणे उपपरीसर |
| ठराव | ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांसोबत मा. कुलगुरुंची बैठक झाली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने खालील मुद्द्यावर चर्चा करण्यात आली.<br>१) ठाणे उपपरीसर अंतर्गत रस्त्यांची कामे ठाणे महानगरपालिका करून देईल.<br>२) ठाणे महानगरपालिका ठाणे उपपरीसर खेळांचे मैदान विकसित करून देईल.<br>३) मुंबई विद्यापीठाची जलनिस्सारण व मलनिस्सारण व्यवस्था आवश्यक गटार बांधणी करून ठाणे महानगरपालिकेच्या व्यवस्थेस जोडण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| | ४) रुणवाल गार्डन सोसायटी ते मुंबई विद्यापीठ उपपरिसर यादरम्यान पक्का पोहच रस्ता ( All weather motorable road) नसल्याने पावसाळ्यात विद्यार्थी व कर्मचारीवृन्द यांना येण्या-जाण्यास अडचण होते तरी वरील पोहच रस्त्याचे काम तातडीने करून मिळावे.<br>५) मुंबई विद्यापीठ ठाणे उपपरिसराची कार्यालयीन वेळ १०:०० ते संध्याकाळी ५:३० वाजे पर्यंत आहे. उपपरिसरात सुमारे ५०० विद्यार्थी व २५ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी असल्याने सकाळी ९:३० ते १०:१५ या कालावधीत तसेच सायंकाळी ५:४५ ते ६:३० या कालावधीत किमान ४ बसेस ठाणे रेल्वे स्थानकातून माजिवाडा व सिडको बस स्थानक ते मुंबई विद्यापीठ ठाणे उपपरिसर पर्यंत चालविण्यात याव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांना तसेच कमर्चाऱ्यांना वेळेवर पोहचता येईल व विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होणार नाही.<br>६) मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपपरिसर नावाचे 'दिशादर्शक फलक ' अग्निशमन कार्यालय ते ठाणे उपपरिसर तसेच बालकुंभ नाका ते ठाणे उपपरिसर यादरम्यान लावण्यात यावे.<br>७) धर्मवीर आनंद दिघे महानगरपालिकेचा जलतरण तलाव ठाणे उपपरिसरातील विद्यार्थी व कर्मचारी यांना सवलतीच्या दरात वापरायची परवानगी देण्यात यावी.<br>८) मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपपरिसरात खुली ग्रीन जीमची व्यवस्था करून मिळावी.<br>९) ठाणे महानगरपालिकेमार्फत संरक्षक भिंत बांधकामासाठी नव्याने विकसित केलेले तंत्रज्ञान व बांधकाम साहित्य हरित तंत्रज्ञानास अनुसरून असल्याने विद्यापीठाच्या (Green Campus Initiative) उपक्रमास पूरक आहे. त्यामुळे सदर तंत्रज्ञान व बांधकाम साहित्य उपपरिसराच्या जीर्ण झालेल्या व अपूर्ण राहिलेल्या संरक्षक भिंत बांधकामासाठी उपलब्ध करून देण्यात यावे.<br>१०) मुंबई विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्य विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये राज्य विद्यापीठ असल्याने विविध करांतर्गत प्राप्त सवलती विद्यापीठास उपलब्ध करून द्याव्यात.<br>११) मुंबई विद्यापीठातर्फे ठाणे उपपरिसर व सी.डी. देशमुख संस्था यांच्या दरम्यान स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यासाठी करारनामा करणेस यांच्या मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर.<br>मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपपरिसर आवारात ठाणे महानगरपालिकेकडून हायमास्ट पोल उभारणीस मान्यता देण्यात आली. ठाणे उपपरिसर संचालक यांनी महानगर पालिकेच्या पत्राची खात्री करावी. तसेच सदर बाब आजच्या सभेतच मंजूर करण्यात आली. | |
| ९ | The matter to collaborate with the NTA to set up an examination Centre in University of Mumbai is being placed before the Management Council for its consideration. | AAQA |

| | | |
|---|---|---|
| ठराव | सदर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्यात यावे असे ठरले. | |

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

May be appr...

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू